आर.सी.सी.क्रं.६७१/२०१९
नि. क्रमांक. २८.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-
माझे नाव :- रामकृष्ण ज्ञानोबा माळी,
वय सुमारे :- ४७ वर्षे, व्यवसाय :- शेती,
निवासस्थान :- चांदखेड ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

१. मी चांदखेड येथे राहतो. माझ्या कुटुंबामध्ये मी माझ्या भाउ त्याची मुले व आई वडील असे मिळून राहतात. माझ्या शेती व विट भट्टीचा व्यावसाय आहे. विट भट्टचा व्यावसाय मी सुधीर बारमुख यांच्या शेतामध्ये चांदखेड येथे करतो. मी आरोपींना ओळखतो कारण ते माझ्या गावातील आहे.

२. दि.२०/०८/२०१९ रोजी माझी आई अरुणा माळी सकाळी १०.०० वाजण्यांच्या सुमारास विट भट्टी जवळ खुरपण्यासाठी गावातील महिला घेवून गेली होती. माझी आई दुपारी २.४५ सुमारास घरी आली तेव्हा मी तीला काय झाले असे विचारले असता ती म्हणाली की, श्रीकांत गायकवाड गुरे घेवून शेतामध्ये आला व भुईमुगामध्ये गुरे घातले गुरांनी भुईमुग खाला. माझ्या आईने त्यास गुरं शेतातून काढ असे म्हणले असता श्रीकांत गायकवाड यांने शिव्या देण्यास सुरवात केली. त्याच्या हातमध्ये लोखंडी सळई होती तो माझ्या आईला म्हणाला की, सळई अवघड जागेध्ये फिरवन व तिचा हात ओढला

३. मजूर बायांनी त्यास शिव्या का देतो असे विचाले असता तो म्हणाला की, तुम्ही मध्ये कोण बोलणार. मजुर महिलांनी श्रीकांत गायकवाड याने धरलेला हात सोडला. आईने घडलेला प्रकार हा मला सांगितल्यानंतर मी व माझा भाउ घटनास्थळी गेलो तेव्हा तेथे श्रीकांत गायकवाड व चारुदत् गाकवाड हजर होते. माझ्या भावाने श्रीकांत गायकवाड यास आईचा हात का पकडला असे विचारले असता त्याने माझ्या भावाच्या उजव्या पायावर लोखंडी सळईने मारहान केली. माझ्या भावाने हात वर केला तेव्हा त्याने माझ्या भावास हातावर लोखंडी सळईने मारले. माला चंद्रकांत व शीवदत्त याने लाथाबुक्याने मारहाण केली.

४. माझ्या भाउ घटनेच्यावेळी पोलीस पाटील होता. चंद्रकांत हा माझ्या भावास म्हाणली की, तु गावचा पोलीस पाटील कसा राहतो ते पहातो. असे बोलूण शिवीगाळ व धमकी दिला. त्यानंतर मी, माझी आई असे मिळून शिरगांव पोलीस ठाण्यात गेलो व त्यांना घटनेचा प्रकार सांगितला. पोलीसांनी माझ्या आईच्या सांगण्यावरुन प्रथम खबरी अहवाल नोंदविला. पोलीसांनी माझ्या जबाब नोंदविला होता. आरोपी आज रोजी न्यायालयामध्ये हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास आरोपी तर्फे विदवान वकिल श्री. अक्षय रौंदळ यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

५. घटनो हि दि. २०/०८/२०१९ रोजी घडली होती व तक्रार ही दि. २१/०८/२०१९ रोजी खबर नोंदविण्यात आली. हे म्हणणे खेर आहे की, सुधीर बारमुख यांनी माला शेती भाडे तत्वावर दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या व्यावसाय करुन शेत करत होतो. मी बारमुख यांना घटना घडल्याचे सांगितले नाही. विट भट्टी वर श्रीकांत गायकवाड यांच्या शेतामध्ये दहा शेताचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गायकवाड व माझा रस्ता वेगळा आहे. घटलेली घटनो आईने मला सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडल्याचे मी पाहिले नव्हते व आई मला घटना घडल्याचे सागितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी भुईमुगाच्या शेजारी कडेने चारत होता. हे म्हणणे खर नाही की, आईने माल घडलेला प्रकार सांगितला. हे म्हणणे खर नाही की,आईने घडलेला प्रकार मला सांगितल्यामुळे मला राग आला व मी सळई घेवून आरोपींना मारण्यासाठी गेलो होतो.

६. हे म्हणणे खर आहे की, माझी आई खुरपण्यासाठी खुरपे घेवून गेली होती. घरापासून शेतापर्यंत चालत जाण्यासाठी १० ते १५ मि. लागतात. आरोपी कडे किती गुरे होते हे माला सांगता येणार नाही. आरोपींनी माझ्यावर तक्रार केल्याचे मला आठवड नाही. माझ्या भाउ पोलीस पाटील असल्यामुळे त्यांचे पोलीस ठाण्यात नेहमी ये जा करत असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व साक्षीदार हे माझ्या घरातील साक्षीदार आहे. पोलीसांनी माझ्या जबाबावर सही घेतल्याचे मला आठवत नाही. मी शेतामध्ये गेलो तेव्हा तेथे गुरे असल्याचे माला आठवत नाही.

७. घटनेपुर्वी आरोपीने खबरीच्या आईस शिव्या दिल्याचे मला आठवत नाही. घटनेच्या वेळी मजुर बायांकडे फोन असल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मार हाणीची कुढली घटना घडली नाही. केवळ आरोपीची गुरे शेतात आल्याने आरोपी विरुध्द प्रस्तुत केस केलेली आहे. घटनेच्या वेळी माझ्या आईचे वय ६५ वर्षे होते.

**उलटतपास पूर्ण**
**फेरतपास** - काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

**Sd/xxx**
**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

**नांक. १२/०६/२०२६**